**सक्षिपत क्रिमीनल केस नं.२३७/ २०१०**
**नि.१३३/ सी सोबत पुरवणी**

**फिर्यादी तर्फे ॲड.एच.ए.नदाफ यांचेमार्फत सरतपास सुरु.**

२. दि.२२डिसेंबर २००६ रोजी मला भूतलक्षी प्रभावाने सेवानिवृत्त केले. मी नियमाप्रमाणे दि.२६ डिसेंबर २००६ रोजी सेवानिवत्त होणार होतो. दि.२३ ते २५ डिसेंबर सुट्टी होती. मी नगरपालिका जयसिंगपूर यांचेविरुध्द कामगार न्यायालयात कोल्हापूर येथे मला भूतलक्षी नियमाने सेवानिवृत्त केलेच्या आदेशान्वये केस क्र. युएलटी लनं. ३/ २००७ ही दाखल केली. त्या केसचा निकाल सप्टेंबर २००८ ला लागला. त्या निकालाची प्रत न्यायालयात हजर केली आहे. त्यास **नि.१४२** देणेत येत आहे. सदर अर्ज मजूंर करणेत आला व मला भूतलक्षीप्रभावाने निवृत्त केल्याचा आदेश रदद् करणेत आला. आस्थापना क्लार्क व मुख्याध्याकारी म्हणजेच आरोपी क्र. १ व२ यांनी मला राजकीय व सामाजिक दृष्टया बदनाम करण्याच्या हेतूने प्रेस कॉनफरन्स घेतली. त्यामूळे वर्तमानपत्रात माझेबाबत खोटी बातमी प्रसिध्द करणेत आली. वर्तमान पत्राात बातमी प्रसिध्द झालेने माझी शिरोळ तालुक्यात विशेषता जयसिंगपूर शहरात, समाजात मित्र परिवार, सहकारी कर्मचारी यांचेमध्ये माझी बदनामी झाली. सदर बातमी दैनिक जनप्रवास, दै.सकाळ या वर्तमानपत्रात दिनांक २९ फेब्रुवारी २००८ रोजी प्रसिध्द करणेत आली. दै.सकाळ मध्ये सदर बातमी पान नं. ३ व ४ मध्ये प्रसिध्द करणेत आली व दै.जनप्रवास मध्ये सदर बातमी पान नं. १ वर प्रसिध्द करणेत आली. सदर वर्तमानपत्रे मी न्यायालयात दाखल केलेली आहेत. त्यास **नि.१४३** व **१४४** देणेत येत आहे. सदर बातमी ही मी खोटी जन्मतारीख देवून ६,६१,१२५ रुपयाची नगरपालीकेची फसवणूक केल्याबाबत प्रसिध्द करणेत आली. सदर बातमीमध्ये जन्म तारखेच्या दाखल्यात खाडाखोड करुन जन्म तारखेचे साल ४८ केले व सदरची खाडाखोड मी स्वता केली, अशी बातमी प्रसिध्द झाली. ही बातमी खोटी आहे. सदर बातमी कामगार न्यायालयाने नगरपालीकेचे म्हणणे रास्त आहे असे मानून नगरपालीकेचे बाजूने निकाल दिला अशी खोटी बातमी प्रसिध्द केली. सदर बातमी आरोपी क्र. १ व २ यांनी प्रसिध्द करुन घेतली. दै.जनप्रवास मध्ये सदर बातमी दि.२९ फेब्रुवारी २००८ रोजी प्रसिध्द झाली.
दै.जनप्रवास मध्ये खोटा जन्म दाखला देवून नगरपालिकेची फसवणूक या शिर्षकाखाली बातमी प्रसिध्द करणेत आली. सदर बातमी आरोपी क्र.२ यांनी आरोपी क्र. १ यांचे सांगण्यावरुन दिली. सदर बातमीमध्ये नोकरीसाठी जोडलेल्या शाळेच्या दाखल्यात मी खाडाखोड केली अशी खोटी बातमी दिली. एका बातमीत जन्मदाखल्यात तारखेत खाडाखोड व दुस—या बातमीत शाळा सोडल्याच्या तारखेत खाडाखोड अशी विरोधी बातमी प्रसिध्द करणेत आली. आरोपी क्र. १ व २ यांना माझे जन्मतारखेची पुर्ण कल्पना होती. संबंधित सर्व कागदपत्रे नगरपालिका जयसिंगपूर यांच्या कार्यालयात उपलब्ध होते. मी जन्मदाखल्यात खाडाखोड केल्याबाबत कोणताही ठराव नगरपालिकेचा अगर स्थायी कमिटीचा नाही. किंवा

तसा कोणताही प्रस्ताव नाही. माझेविरुध्द खोटयाा बातम्या प्रसिध्द झाल्या त्यामूळे माझी समाजात बदनामी होवून माझे चारित्र हनन झाले. माझे प्रतिष्ठेला धक्का बसला. आरोपी क्र. ३ ते ६ यांनी प्रसिध्द केलेल्या बातमीची कोणतीही शहानिशा न करता खोटी बातमी प्रसिध्द केली. आरोपीनी बातमी प्रसिध्द करणेपुर्वी माझेकडे कोणतीही चौकशी केली नाही. वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द होवून आलेवर मला समजले. त्यानंतर मी माझे वकिलामार्फत सर्व आरोपींना दि.२४.३.२००८ रोजी नोटीस पाठवली. नोटीस मिळूनदेखील आरोपी क्र. १ याने कोणतेही उत्तर दिले नाही. आरोपी क्र. ३ व ४ यांनी सदर बातमी ही आरोपी क्र.१ यांनी दिलेल्या लेखी व तोंडी माहितीच्या आधारे प्रसिध्द केल्याचे मला कळवले. मी आरोपीना दिलेल्या नोटीसीवर माझे वकिलांची व माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.१४५,१४६,१४७,१४८** देणेत येत आहे. त्यास आरोपी क्र. १ ने दिलेले उत्तर दाखल केलेले त्यास **नि.१४९** देणेत येत आहे. तसेच आरोपी क्र.३ व ४ यांनी दिलेले उत्तर दाखल केलेले आहे. त्यास नि.**१५०** देणेत येत आहे.आरोपी क्र. २ याने दिलेले उत्तर **नि.१५१** येथे दाखल केलेले आहे. त्याबाबत पाठविलेल्या पावत्या व पोहोचपावत्या व्हेरीफाईड प्रत न्यायालयात दाखल केलेली आहे. त्यास **नि.१५२ ते १६०** देणेत येत आहे. आरोपी क्र. १ ते ६ यांनी संगनमताने खोटी बातमी प्रसिध्द करुन माझी बदनामी केली. या बातमीमूळे माझे घरची शांतता नष्ट झाली व मला शारिरिक, आर्थीक त्रास सहन करावे लागले. सर्व आरोपींना कडक शासन करणेत यावे.सर्व आरोपींना मी ओळखतो. ते आज न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी क्र.१तर्फे ॲड.जी.के.आंबेकर यांचेमार्फत सुरु.**

३. मी सन १९७५ साली तात्पुरत्या स्वरुपात नगरपालिका जयसिंगपूर येथे नोकरीस लागलो.

**उलटतपास तोंडी विनंती वरुन पुढील तारखेपर्यत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

वा.दा.का.दा

दि.१२.६.२०१९ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,जयसिंगपूर